◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

NEED24 NEWS
हर ख़बर, हर शहर

नीड 24 न्यूज़

हर खबर, हर शहर

◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

DIGITAL E-PAPER

PRGI APPLICATION UNDER PROCESS
Application No. T/GJ/2026/0619/2304/1577

GST
GSTIN 24CINPG0564Q1ZT

UDYAM REGISTERED
UDYAM-GJ-14-0003714

◆ DIGITAL NEWS NETWORK ◆
भारताचे विश्वासार्ह बहुभाषिक डिजिटल न्यूज नेटवर्क
11+ Languages | 24×7 Live | e-Paper Daily

आमचे App डाउनलोड करा
Download on the App Store
GET IT ON Google Play

www.need24.digital
info@need24.in
+91 98700 06472
FOLLOW US:

तेज़ | सटीक | निष्पक्ष | जनहित में | सच की आवाज़ | जन-जन की आवाज़ | निडर पत्रकारिता

MAHARASHTRA | नीड 24 न्यूज़ · हर खबर, हर शहर | 04 नवम्बर 2026

स्थानीय

छत्रपती संभाजीनगर: पब, बार आणि रेस्टॉरंटसाठी नवीन नियमावली लागू



छत्रपती संभाजीनगर शहरात पब, बार आणि रेस्टॉरंट चालवण्यासाठी प्रशासनाने एक नवीन नियमावली जाहीर केली आहे. या नियमावलीमध्ये विविध नियमांचा समावेश असून, शहरातील या आस्थापनांच्या कामकाजावर याचा परिणाम होणार आहे.

नवीन नियमावलीनुसार, पब, बार आणि रेस्टॉरंट चालकांना विशिष्ट नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल. यामध्ये परवाना प्रक्रिया, वेळेचे बंधन, सुरक्षा मानके आणि इतर आवश्यक बाबींचा समावेश आहे. प्रशासनाने या नियमावलीचा उद्देश शहरातील व्यवसाय अधिक सुव्यवस्थित करणे आणि नागरिकांच्या सुरक्षेची खात्री करणे हा असल्याचे म्हटले आहे.

या नियमावलीच्या अंमलबजावणीमुळे शहरातील मनोरंजन आणि खाद्य उद्योगात काही बदल घडून येण्याची शक्यता आहे. संबंधित व्यवसायिकांनी या नवीन नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे.

— IMRAN BELIM

ओतूर मार्केटमध्ये तरकारी भाजीपाल्याच्या आवकमध्ये वाढ; बाजारभावात थोडी घसरण



जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ओतूर उपबाजार आवारात तरकारी भाजीपाल्याची आवक वाढली असून बाजारभाव घसरले आहेत. प्रति दहा किलो प्रमाणे बाजारभाव पुढीलप्रमाणे आहेत: फ्लॉवर ३० ते ९०, कोबी २० ते ५०, काकडी १०० ते २५०, घेवडा २०० ते ४००, वांगी १०० ते ३५०, बीट १०० ते २००, शिमला १०० ते २५०, तोंडली १०० ते ४५१, पावटा ३०० ते ६००, राजमा ३०० ते ९००, वाटाणा ३०० ते १०५१, तूर ३०० ते ५००, भेंडी १०० ते २५०, चवळी १०० ते ३५०, मिरची २०० ते ६०० इत्यादी. अशी माहिती ओतूर कार्यालयाच्या वतीने देण्यात आली.

— Ashok durgude, पुणे

ओतूर मार्केटमध्ये तरकारी भाजीपाल्याच्या आवकमध्ये वाढ; बाजारभावात थोडी घसरण



जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ओतूर उपबाजार आवारात तरकारी भाजीपाल्याची आवक वाढली असून बाजारभाव घसरले आहेत. प्रति दहा किलो प्रमाणे बाजारभाव पुढीलप्रमाणे आहेत: फ्लॉवर ३० ते ९०, कोबी २० ते ५०, काकडी १०० ते २५०, घेवडा २०० ते ४००, वांगी १०० ते ३५०, बीट १०० ते २००, शिमला १०० ते २५०, तोंडली १०० ते ४५१, पावटा ३०० ते ६००, राजमा ३०० ते ९००, वाटाणा ३०० ते १०५१, तूर ३०० ते ५००, भेंडी १०० ते २५०, चवळी १०० ते ३५०, मिरची २०० ते ६०० इत्यादी. अशी माहिती ओतूर कार्यालयाच्या वतीने देण्यात आली.

— Ashok durgude, पुणे

कृषि

पावसाअभावी खरीप पिके करपली! सरसकट मदतीसाठी मुरबाड तहसीलवर 'शेतकरी न्याय हक्क मोर्चा'; शिवसेनेचा (उबाठा) एल्गार



नीड २४ न्यूज महाराष्ट्र

दिनांक: ४ नोव्हेंबर २०२६

ठाणे जिल्हा रिपोर्टर: काशिनाथ देसले

मुरबाड तालुका रिपोर्टर: किशोर पवार

मुरबाड विशेष बातमी पत्र.

पावसाअभावी खरीप पिके करपली! सरसकट मदतीसाठी मुरबाड तहसीलवर 'शेतकरी न्याय हक्क मोर्चा'; शिवसेनेचा (उबाठा) एल्गार

• निवासी नायब तहसीलदार बांगर मॅडम यांना ११ मागण्यांचे निवेदन सादर

• संपूर्ण मुरबाड तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकरी, आदिवासी बांधव आणि उबाठा शिवसेना पदाधिकारी-कार्यकर्त्यांची प्रचंड गर्दी

• 'मी सदैव तुमच्या पाठीशी खंबीरपणे राहीन' – जिल्हाप्रमुख मधुकर (आप्पा) घुडे यांचे आश्वासन

मुरबाड:

मुरबाड तालुक्यात यंदा पावसाने दगा दिल्यामुळे तीव्र दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पाऊस न पडल्यामुळे हाताशी आलेले भात, नागली, वरई, उडीद आणि इतर खरीप कडधान्ये शेतातच जळून खाक झाली आहेत. या संकटामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये थेट आर्थिक मदत मिळावी, यासह इतर ११ प्रमुख प्रलंबित मागण्यांसाठी आज मुरबाड तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा भव्य 'शेतकरी न्याय हक्क मोर्चा' धडकला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ठाणे जिल्हाप्रमुख श्री. मधुकर (आप्पा) घुडे यांच्या नेतृत्वाखाली आणि ज्येष्ठ नेते पोपटराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हे तीव्र आंदोलन करण्यात आले.

तालुक्यातील शेतकरी आणि शिवसैनिकांचा या मोर्च्यामध्ये संपूर्ण मुरबाड तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकरी आणि दुर्गम भागातील आदिवासी नुकसानग्रस्त शेतकरी अत्यंत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे बळिराजाच्या या लढ्याला ताकद देण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सर्व स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. लागवड केलेली पिके पाण्याचा एक थेंब न मिळाल्याने पूर्णपणे वाळून गेल्याने बळिराजा आर्थिक गर्तेत सापडला असून त्याच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. मोर्चेकऱ्यांनी हातात करपलेली पिके घेऊन शासकीय धोरणांचा तीव्र निषेध केला आणि संपूर्ण परिसर घोषणांनी दणाणून सोडला.

११ मागण्यांचे निवेदन; शेतकरी प्रतिनिधी पारधी यांची स्वाक्षरी

मोर्चा तहसील कार्यालयावर पोहोचल्यानंतर आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाने मा. निवासी नायब तहसीलदार बांगर मॅडम यांची भेट घेऊन त्यांना ११ मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर केले. या अधिकृत निवेदनावर शेतकरी प्रतिनिधी पारधी यांनी स्वाक्षरी केली असून, त्याद्वारे प्रशासनासमोर पुढील प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या:

१. तालुक्यात पावसाअभावी झालेल्या नुकसानीची कृषी आणि महसूल विभागामार्फत तात्काळ 'संयुक्त पाहणी' (पंचनामे) करण्यात यावी.

२. कोणतीही क्लिष्ट अट न घालता सर्व बाधित व आदिवासी शेतकऱ्यांना हेक्टरी ₹५०,०००/- ची थेट आर्थिक मदत शासनाने मंजूर करावी.

३. चालू वर्षाचा पीक विमा व शेती कर्ज त्वरित माफ करून पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांना नवीन कर्ज उपलब्ध करून द्यावे.

मी शेतकऱ्यांच्या पाठीशी सदैव राहीन – मधुकर (आप्पा) घुडे

यावेळी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना जिल्हाप्रमुख मधुकर (आप्पा) घुडे यांनी तालुक्यातील भीषण दुष्काळी परिस्थितीवर सविस्तर मार्गदर्शन केले. "सरकारने आणि प्रशासनाने शेतकऱ्यांची थट्टा थांबवून तातडीने मदत दिली पाहिजे. आमचा आदिवासी बांधव आणि बळिराजा आज संकटात आहे, अशा काळात शिवसेना त्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरली आहे," असे ते म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी, "प्रशासनाने कितीही दुर्लक्ष केले, तरी मी स्वतः आणि आमचा पक्ष शेतकऱ्यांच्या पाठीशी सदैव खंबीरपणे उभा राहीन," असे जाहीर आश्वासन देत शेतकऱ्यांना व आदिवासी बांधवांना धीर दिला.

तीव्र आंदोलनाचा इशारा

ज्येष्ठ नेते पोपटराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या आंदोलनात प्रशासनाला स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, जर येत्या आठ दिवसांत या ११ मागण्यांवर ठोस आणि सकारात्मक निर्णय झाला नाही, तर याहूनही तीव्र आणि व्यापक स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल.

या मोर्च्याला तालुक्यातील विविध गावांतील आदिवासी बांधव, शेतकरी प्रतिनिधी, उबाठा शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी, महिला आघाडी, युवा सेना कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

— Kashinath Desale, ठाणे

देश

कुंभमेळ्याच्या उद्घाटन सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे कोरपना तालुक्यातील आदिवासी नृत्याने भव्य स्वागत



कुंभमेळ्याच्या उद्घाटन सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे कोरपना तालुक्यातील आदिवासी नृत्याने भव्य स्वागत

चंद्रपूर : भारताच्या महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी नाशिक येथील तपोवन परिसरात कुंभमेळ्याच्या उद्घाटन सोहळ्यानिमित्त विशेष स्वागत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील आदिवासी मुला-मुलींनी पारंपरिक आदिवासी नृत्य सादर करून महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे उत्साहपूर्ण स्वागत केले. आपल्या पारंपरिक वेशभूषेत आणि लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

या आदिवासी नृत्य पथकाचे नेतृत्व माननीय अशोकजी आलम, माजी पंचायत समिती सदस्य तथा भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर जिल्हा आदिवासी आघाडीचे महामंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी चिचपल्ली येथील रहिवासी राकेश निंबसरकर यांनीही अशोकजी आलम यांच्यासोबत महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

देशाच्या महामहिम राष्ट्रपतींच्या स्वागतासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील आदिवासी मुला-मुलींना मिळालेली ही संधी संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या माध्यमातून आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, परंपरा आणि लोककलेचे राष्ट्रीय स्तरावर दर्शन घडले.

या उल्लेखनीय सहभागाबद्दल अशोकजी आलम, राकेश निंबसरकर तसेच आदिवासी नृत्य सादर करणाऱ्या सर्व मुला-मुलींचे परिसरातून कौतुक आणि अभिनंदन करण्यात येत आहे.

— DOCTOR PINTU PAUL

चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील आदिवासी मुला-मुलींना मिळालेली ही संधी संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या माध्यमातून आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, परंपरा आणि लोककलेचे राष्ट्रीय स्तरावर दर्शन घडले.

या उल्लेखनीय सहभागाबद्दल अशोकजी आलम, राकेश निंबसरकर तसेच आदिवासी नृत्य सादर करणाऱ्या सर्व मुला-मुलींचे परिसरातून कौतुक आणि अभिनंदन करण्यात येत आहे.

— DOCTOR PINTU PAUL

शिक्षा

राजगड तालुका प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेचे व्यावहारिक धडे



राजगड तालुका, पुणे येथील दुर्गम कोंढावळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेचे धडे देण्यात आले. या उपक्रमाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांना पीडीसीसी बँक, एटीएम केंद्र, ज्ञान प्रबोधिनी संस्था, पोस्ट ऑफिस आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांसारख्या संस्थांना क्षेत्रभेटी आयोजित करण्यात आली.

भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी बँकिंग व्यवहार, बचत योजना, टपाल सेवा, विमा योजना व विविध शासकीय योजनांची प्रत्यक्ष माहिती मिळवली. बँकांतील जमा-उतार, एटीएमचा वापर, पोस्ट ऑफिसची कार्यपद्धती आणि विमा व सरकारी योजनांच्या लाभांबद्दल त्यांनी थेट प्रश्न विचारून स्पष्टता मिळवली.

या प्रत्यक्ष अनुभवामुळे विद्यार्थ्यांच्या पुस्तकी ज्ञानासोबत व्यावहारिक शिक्षणाची जोड मिळाली. प्रश्न विचारणे, मुलाखती घेणे आणि माहितीचे संकलन यामुळे त्यांच्या निरीक्षणशक्ती, संभाषण कौशल्य आणि आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली. आर्थिक साक्षरतेचे महत्त्व, बचतीचे मूल्य आणि व्यावसायिक कौशल्यांची जाणीवही या क्षेत्रभेटीद्वारे बळकट झाली.

उपक्रमाचे आयोजन स्थानिक शैक्षणिक व सामाजिक संस्थांच्या सहयोगाने करण्यात आले, ज्यामुळे ग्रामीण भागातील मुलांना आर्थिक जागरूकता व आत्मनिर्भरतेचा पाया घातला गेला.

— किरण सदाशिव आंबिके

स्थानीय

अवकाळी पावसाने भोर तालुक्यातील झेंडू फुलांना धक्का, शेतकरी चिंतेत



गेल्या दोन-तीन दिवसांपासून पुण्याच्या भोर तालुक्यात अवकाळी पावसाने शेतांमध्ये पाणी साचले, ज्यामुळे झेंडू फुलांना मोठे नुकसान झाले.

झाडांवर उमललेल्या फुलांना पावसाच्या पाण्यात भिजल्याने आणि दमट वातावरणामुळे ती काळी पडून सडू लागली.

दिवाळीच्या सणात बाजारपेठेत झेंडू फुलांची मोठी मागणी असते, त्यामुळे शेतकऱ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी मोठ्या आशेने लागवड केली होती, परंतु पावसामुळे शेतकरी आता चिंतेत आहेत.

बळीराजा हवालदिल झाला आणि त्यांनी सांगितले की हातातोंडाशी आलेला घास अवकाळी पावसाकडून हिरावला जात असल्याने शेतकरी अधिक तणावात आहेत.

— किरण सदाशिव आंबिके

हिंगोली जिल्ह्यातील आमदार तान्हाजी मुटकुळे हे भावी मंत्री, असा दावा



हिंगोली जिल्ह्यातील राजकीय वर्तुळातून एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. या माहितीनुसार, माजी आमदार तान्हाजी मुटकुळे हे भावी मंत्री असतील, असा दावा केला जात आहे.

जिल्हाभरात याबाबत चर्चेला उधाण आले असून, राजकीय पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये या संदर्भात उत्साहाचे वातावरण आहे. तान्हाजी मुटकुळे यांच्या राजकीय कारकिर्दीतील अनुभव आणि लोकप्रियतेचा विचार करता, ते मंत्रीपदी निवडले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हा दावा समोर आल्यानंतर स्थानिक राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया येत आहेत. तान्हाजी मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील विकासकामांना वेग मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

— Sham Chirde

स्वास्थ्य

शिरूर तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांसाठी 'शेकाप'चा एल्गार; भाई पोपटराव बोऱ्हाडे पाटील यांचे उपोषण



शिरूर तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांसाठी 'शेकाप'चा एल्गार; भाई पोपटराव बोऱ्हाडे पाटील यांचे उपोषण

शिरूर प्रतिनिधी : 3 नोव्हेंबर 2026

शिरूर तालुक्यातील पाणीप्रश्न, दुष्काळी मदत वाटप, बेकायदेशीर खाणकाम बंदी आणि विशेष आधारकार्ड शिबिर यांसारख्या नागरिकांच्या विविध मूलभूत व प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे तातडीने लक्ष वेधण्यासाठी भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे शेकाप भाई पोपटराव बोऱ्हाडे पाटील यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. या सर्व मागण्यांचे सविस्तर निवेदन त्यांनी शिरूरच्या तहसीलदारांना सादर केले असून, लवकरात लवकर ठोस कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा स्पष्ट इशारा दिला आहे.

राजकीय पाठिंबा व उपोषणस्थळी भेट

या आंदोलनाची गंभीर दखल घेत 'भारतीय जनवादी पार्टी'चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. अनिल दिवाणजी मल्लाव यांनी उपोषणस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन भाई पोपटराव बोऱ्हाडे पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा केली. "प्रशासनाने या स्थानिक जनहिताच्या प्रश्नांवर तात्काळ व सकारात्मक निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे," असे सांगत मल्लाव यांनी या आंदोलनाला आपला पूर्ण पाठिंबा दर्शवला. यामुळे या आंदोलनाला मोठा राजकीय पाठिंबा मिळाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

आंदोलनातील प्रमुख मागण्या:

सोनसांगवीचा पाणीप्रश्न व 'राखीव झोन'ची मागणी:

शासनाने पाईसर तलावासाठी मोठा निधी खर्च केलेला असताना, तलावाशेजारीच विहीर खोदल्यामुळे तलावातील पाणीपुरवठ्यावर गंभीर परिणाम झाला आहे. ती विहीर तातडीने गावाच्या वापरासाठी अधिग्रहित करून दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच पाईसर तलाव, खंडोबा मंदिर, ऐतिहासिक बारव आणि दशक्रिया घाट परिसर पिण्याच्या पाण्यासाठी 'राखीव झोन' घोषित करून संपूर्ण परिसरात वृक्षलागवड करण्यात यावी.

कायमस्वरूपी बंदी:

सोनसांगवी महसुली हद्दीतील डबराच्या खाणी व खडी क्रशर कायमस्वरूपी बंद करण्यात यावेत. भविष्यात या भागात नवीन खाण किंवा क्रशरला कोणतीही परवानगी देऊ नये, तसेच सोनसांगवी व आमदाबाद परिसरातील वनक्षेत्राचे सक्तीने रक्षण करण्यात यावे.

दुष्काळी मदतीचे सर्वसमावेशक वाटप:

शिरूर तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, भूमिहीन, बँक कर्ज न मिळालेले अथवा बेघर नागरिक या मदतीपासून वंचित राहू नयेत. तालुक्यातील प्रत्येक गरजू व शेवटच्या घटकापर्यंत ही दुष्काळी मदत पोहोचवण्यात यावी.

विशेष आधार कार्ड नोंदणी व दुरुस्ती शिबिर:

आधार कार्ड उपलब्ध नसल्याने किंवा त्यात दुरुस्ती बाकी असल्याने अनेक नागरिक विविध शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे तहसीलदारांनी आपल्या विशेष अधिकारांचा वापर करून दोन दिवसांचे विशेष आधार नोंदणी व दुरुस्ती शिबिर आयोजित करावे.

प्रशासनाला इशारा व उच्चस्तरीय प्रती रवाना

जनहिताच्या या सर्व न्याय्य मागण्यांवर प्रशासनाने तातडीने आवश्यक त्या सूचना देऊन अंमलबजावणी करावी, अन्यथा आंदोलन अधिक व्यापक आणि तीव्र केले जाईल असा स्पष्ट इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, लोकायुक्त, पुणे जिल्हाधिकारी, शिरूर पोलीस निरीक्षक आणि रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याला आवश्यक कारवाईसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

— Anil Mallav, पुणे

पिंपळनेरमध्ये गुटखा तस्करी उघड; ३० लाखांचा मुद्देमाल जप्त, तिघांवर गुन्हा....!!



विभागीय प्रतिनिधी

धुळे : राज्यात बंदी असतानाही चोरट्या मार्गाने होणारी गुटखा, पानमसाला आणि तंबाखूची विक्री अन्न व औषध प्रशासनाने उधळून लावली. पिंपळनेर येथे पहाटे केलेल्या धडक कारवाईत प्रशासनाने ३० लाख ९१ हजार ९०० रुपये किमतीचा २० हजार ३८२ पॅकेट्सचा साठा जप्त केला. या प्रकरणी तिघांविरुद्ध पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

प्रशासनाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. पिंपळनेरमध्ये गुपचूप प्रतिबंधित गुटख्याची विक्री सुरू असल्याची माहिती मिळताच पथकाने सापळा रचला. ३ नोव्हेंबर रोजी पहाटे सुमारे २ वाजता सटाणा रोडवरील ईदगापाडा परिसरात भारत गॅसजवळ दोन वाहनांची तपासणी करण्यात आली. एमएच ४६ बीएम ६०९७ आणि एमएच ४६ बीयू ७८८५ या क्रमांकांच्या वाहनांमध्ये प्रतिबंधित पदार्थांचा मोठा साठा आढळला.

जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पुढील कारवाईसाठी पिंपळनेर पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला आहे. साहेबराव वंजी साबळे, गणेश वंजी साबळे आणि संदीप गुलाब ठाकरे, तिघे राहणार बल्हाणे, तालुका साक्री, जिल्हा धुळे, अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

आयुक्त तुकाराम मुंडे, सह आयुक्त (अन्न) मंगेश माने, सहायक आयुक्त (अन्न) गोपाल माहोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद पवार, शशिकांत राणे, अरविंद राऊत आणि मंगेश भावसार यांच्या पथकाने ही कारवाई पार पाडली. प्रतिबंधित पदार्थांच्या विक्रीविरोधात यापुढेही अशाच कठोर कारवाया सुरू राहतील, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

— Maheshprasad Ramkrishnaprasad Dixit

३० लाखांचा मुद्देमाल जप्त, तिघांवर गुन्हा



विभागीय प्रतिनिधी

धुळे : राज्यात बंदी असतानाही चोरट्या मार्गाने होणारी गुटखा, पानमसाला आणि तंबाखूची विक्री अन्न व औषध प्रशासनाने उधळून लावली. पिंपळनेर येथे पहाटे केलेल्या धडक कारवाईत प्रशासनाने ३० लाख ९१ हजार ९०० रुपये किमतीचा २० हजार ३८२ पॅकेट्सचा साठा जप्त केला. या प्रकरणी तिघांविरुद्ध पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

प्रशासनाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. पिंपळनेरमध्ये गुपचूप प्रतिबंधित गुटख्याची विक्री सुरू असल्याची माहिती मिळताच पथकाने सापळा रचला. ३ नोव्हेंबर रोजी पहाटे सुमारे २ वाजता सटाणा रोडवरील ईदगापाडा परिसरात भारत गॅसजवळ दोन वाहनांची तपासणी करण्यात आली. एमएच ४६ बीएम ६०९७ आणि एमएच ४६ बीयू ७८८५ या क्रमांकांच्या वाहनांमध्ये प्रतिबंधित पदार्थांचा मोठा साठा आढळला.

जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पुढील कारवाईसाठी पिंपळनेर पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला आहे. साहेबराव वंजी साबळे, गणेश वंजी साबळे आणि संदीप गुलाब ठाकरे, तिघे राहणार बल्हाणे, तालुका साक्री, जिल्हा धुळे, अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

आयुक्त तुकाराम मुंडे, सह आयुक्त (अन्न) मंगेश माने, सहायक आयुक्त (अन्न) गोपाल माहोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद पवार, शशिकांत राणे, अरविंद राऊत आणि मंगेश भावसार यांच्या पथकाने ही कारवाई पार पाडली. प्रतिबंधित पदार्थांच्या विक्रीविरोधात यापुढेही अशाच कठोर कारवाया सुरू राहतील, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

— Maheshprasad Ramkrishnaprasad Dixit

स्थानीय

इंदापूरच्या श्री महालक्ष्मी बाजारात स्वस्त होलसेल दरात संपूर्ण दिवाळी बाजार



इंदापूरच्या श्री महालक्ष्मी बाजारात दिवाळीच्या संधीकडे लक्ष वेधून घेणारा मोठा होलसेल बाजार उभा राहिला आहे. बाजाराचे मालक अतुलजी झगडे यांनी महागाईच्या काळातही स्वस्त दरात विविध किराणा वस्तू उपलब्ध करून ग्राहकांना आनंदित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

साखर प्रति किलो 55 रुपये, दाळ 88 रुपये, गरा 36 रुपये आणि मैदा 36 रुपये यांसारख्या मूलभूत वस्तूंचे दर बाजारात उपलब्ध आहेत. हे दर सामान्य किराणा दुकानांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी आहेत, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात खरेदी करणाऱ्या ग्राहकांना मोठी बचत होते.

दिवाळीच्या सजावटीसाठी आणि प्रसादांसाठी आवश्यक असलेल्या सर्व किराणा सामग्रींची उपलब्धता या बाजारात एकाच ठिकाणी मिळते. ग्राहकांना होलसेल प्रमाणात खरेदी करण्याची सोय असून, विविध कुटुंबे आणि व्यापारी यांचे स्वागत केले जात आहे.

अतुलजी झगडे यांनी या उपक्रमाद्वारे स्थानिक अर्थव्यवस्थेचा विकास आणि ग्राहकांच्या खर्चात घट घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. बाजारात येणाऱ्या लोकांना स्वस्त दरात गुणवत्तापूर्ण वस्तू मिळण्याची खात्री दिली जाते.

स्थानिक रहिवासी आणि व्यापारी या बाजाराला भेट देऊन त्यांच्या खरेदीच्या गरजा पूर्ण करीत आहेत, आणि दिवाळीच्या उत्सवाची तयारी अधिक सोपी व किफायतशीर होत आहे.

नौकरी

शहादा येथे पेन्शन अदालत चे आयोजन



शहादा जिल्हा नंदुरबार येथे पेन्शन अदालत. शहादा दिनांक 3 11 26 रोजी दुपारी 11 वाजता पंचायत समिती येथे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन विषयक अदालतीचे आयोजन करण्यात आले शहादा तालुका सेवानिवृत्त शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाशी म्हणजेच पेन्शन संबंधित अडचणी व तक्रारी सोडवण्यासाठी पेन्शन आदालत चे आयोजन केले या पेन्शन अदालत मध्ये तक्रारीचे प्रकार व त्यांचे निराकरण केले जाते पेन्शन मिळण्यास होणारा विलंब.उपदान किंवा महागाई भत्त्याची थकबाकी न मिळणे. पेन्शन खात्यात नाव किंवा जन्मतारीख यातील दुरुस्ती.कुटुंब निवृत्ती वेतन सुरू करण्यातील अडचणी. या सगळ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी नुकतेच पेन्शन अदालत चे आयोजन करण्यात आले शहादा तालुका पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री शरद भाई पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ह्या पेन्शन अदालतीचे नियोजन करण्यात आले यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी आणि पेन्शन धारक समोरासमोर बसून तक्रारीवर चर्चा करण्यात आली जेणेकरून प्रकरणांच्या तात्काळ निपटारा करता येईल ज्या कर्मचाऱ्यांचे पेन्शनचे प्रश्न प्रलंबित आहेत त्यांनी त्यांचे अर्ज आवश्यक कागदपत्रांचे पंचायत समितीकडे सादर करण्याचे आवाहन प्रशासनाद्वारे करण्यात आले होते कर्मचाऱ्यांच्या गट विमा विषय विचार करण्यात आला तसेच पेन्शन दर महा पाच तारखेच्या आत जमा करण्यात यावे 27 निवड श्रेणी बाबत कार्यवाही करण्यात येईल या उपक्रमामुळे अनेक वृद्ध सेवानिवृत्तांना शासकीय कार्यालयाचे हेलपाटे न मारता न्याय मिळण्यास मदत होते

— Ashok Patil

स्थानीय

मुंबई उच्च न्यायालयाने बीएमसीला दिया मिर्झा अभिनीत पर्यावरणीय दिवाळी जनजागृती व्हिडिओ पुन्हा अपलोड करण्याचा आदेश



न्यायमूर्ती गिरीश एस. कुलकर्णी आणि डॉ. नीला के. गोखले यांच्या खंडपीठाने "तीव्र दुःख आणि नाराजी" व्यक्त केली आणि राजकीय प्रतिक्रियेमुळे आपण "व्यथित" झालो असल्याचे म्हटले.

मुंबईतील वाढते वायू आणि ध्वनी प्रदूषण लक्षात घेता, मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार BMC ने पर्यावरणपूरक व फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्यासाठी एक जनजागृती मोहीम सुरू केली होती. या मोहिमेसाठी BMC ने दिया मिर्झा, माधुरी दीक्षित आणि क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे यांच्यासह काही सेलिब्रिटींना मानधनाशिवाय (Free of charge) सहभागी करून घेतले होते. दिया मिर्झा यांनी सार्वजनिक रस्त्यांवर फटाके न फोडण्याचे आवाहन करणारा एक व्हिडीओ BMC च्या विनंतीवरून तयार केला होता.

हा व्हिडीओ BMC च्या सोशल मीडिया खात्यांवर पोस्ट केल्यानंतर, भाजपचे मुंबई अध्यक्ष आमदार अमित साटम आणि मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी यावर तीव्र आक्षेप घेतला. अमित साटम यांनी म्हटले की, "आम्हाला दिवाळी कशी साजरी करायची याचे धडे दिया मिर्झाकडून घेण्याची गरज नाही". तर महापौर रितू तावडे यांनी दिया मिर्झा यांना 'हिंदूविरोधी' आणि विशिष्ट अजेंडा राबवणाऱ्या ठरवून त्यांना १००% ब्लॅकलिस्ट केल्याचे जाहीर केले. या राजकीय दबावानंतर BMC ने तात्काळ दिया मिर्झा यांचा व्हिडीओ आपल्या

लोणावळ्यात पसरतय एम डी ड्रग्स आणि गांज्या सारख्या अमली पदार्थांचे जाळे



मोठी बातमी! लोणावळ्यात ड्रग्स आणि गांज्याच्या वाढत्या जाळ्याची चिंता; तरुणाईच्या भविष्याचा प्रश्न ऐरणीवर!

खासगी बंगल्यांतील पार्ट्या, अप्रमाणित दारू,एमडी ड्रग्स आणि गांज्याच्या कथित गैरव्यवहाराबाबत नागरिकांमध्ये संताप; अमली पदार्थांच्या तस्करीची पाळेमुळे शोधून कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी!

सुंदर थंडगार हवेचे ठिकाण तसेच निसर्गरम्य पर्यटनस्थळ म्हणून देशभर ओळख असलेल्या लोणावळा शहराला आता अमली पदार्थांच्या वाढत्या गैरवापराच्या चर्चेचे गालबोट लागण्याची भीती व्यक्त होत आहे. ड्रग्स, गांजा आणि एमडीसारख्या अमली पदार्थांच्या कथित खरेदी-विक्री व सेवनाच्या प्रकारांबाबत नागरिकांमध्ये चिंता वाढत असून, या विळख्यात तरुण पिढी अडकण्यापूर्वीच प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

विशेषतः काही खासगी बंगल्यांमध्ये आयोजित होणाऱ्या पार्ट्या, रात्रीच्या संशयास्पद हालचाली आणि आती प्रमाणात दारू आणि अमली पदार्थांच्या कथित वापराबाबत विविध स्तरांतून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. पर्यटनाच्या नावाखाली शहराची प्रतिमा मलिन करणाऱ्या कोणत्याही बेकायदेशीर प्रकाराला थारा मिळू नये, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

लोणावळा हे मुंबई आणि पुणे या दोन महानगरांच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने येथे दरवर्षी तसेच दर शनिवारी व रविवारी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची वर्दळ असते. मात्र, याच पर्यटनाचा गैरफायदा घेऊन काही ठिकाणी अमली पदार्थांचे व्यवहार होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

खासगी बंगल्यांमधील पार्ट्या, निर्जन परिसरातील संशयास्पद हालचाली आणि आती प्रमाणात दारू व अमली पदार्थांच्या सेवनाबाबतच्या तक्रारींची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. विशेषतः शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी आणि २० ते ३० वयोगटातील तरुणांपर्यंत नशेचे आकर्षण पोहोचत असल्याची भीती चिंताजनक आहे.

आजची तरुणाई उद्याचे भविष्य आहे. त्यामुळे या पिढीला अमली पदार्थांपासून दूर ठेवणे ही केवळ पोलिसांची नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे.

केवळ सेवन करणाऱ्यांवर नव्हे, तर पुरवठादारांच्या मुळावर घाव घालनो आता गरजेचे झालेलं आहे.

अमली पदार्थांचा प्रश्न केवळ सेवनापुरता मर्यादित नसून त्यामागील संपूर्ण पुरवठा साखळी शोधणे महत्त्वाचे आहे. अमली पदार्थ कुठून येतात? त्यांचा पुरवठा कोण करतो? त्यांची विक्री कोणत्या माध्यमातून होते? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पोलिसांनी विशेष तपास मोहीम राबवावी, तसेच तुंगार्ली, गोल्ड व्हॅली, प्रिच्छली हिल, कुणेगांव , मळवली, कुरवंडे,या परिसरामध्ये ज्या भाड्याने चालणार्या बंगल्यामध्ये दिवसा व रात्री ऊशीरा पर्यंत पुल पार्ट्या डीजे, आणि दारु पार्ट्या ,चालतात त्याच बंगल्यांन मध्ये आमली पदार्थांचा जास्तीत जास्त उपयोग केला जातो, आशा बंगल्यांवर प्रशासनाने बारकाईने लक्ष ठेवत रात्री पेट्रोलिंग करून आसले गैरप्रकार आढळल्यास त्वरित कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अमली पदार्थांची विक्री व पुरवठा करणाऱ्यांचा शोध घ्यावा संशयास्पद ठिकाणांवर कायद्यानुसार नियमित तपासणी करावी. खासगी बंगल्यांतील पार्ट्यांवर आवश्यक ती देखरेख ठेवावी. अमली पदार्थांच्या तस्करीमागील संपूर्ण साखळी उघड करावी. शाळा व महाविद्यालयांमध्ये नशामुक्ती जनजागृती मोहीम राबवावी.

लोणावळ्यात पसरनार्या या जाळ्याला आळा बसवन्याचे मोठे आव्हान हे लोणावळा पोलिस पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी समन्वय साधून अमली पदार्थांविरोधात सातत्यपूर्ण कारवाई करणे गरजेचे आहे. केवळ एखाद्या ठिकाणी छापा टाकून कारवाई करण्यापेक्षा या अवैध व्यवसायाची मुळे शोधून काढणे अधिक महत्त्वाचे आहे.

नागरिकांनीही संशयास्पद हालचालींबाबत अफवा न पसरवता योग्य ती माहिती पोलिसांपर्यंत पोहोचवावी. आपल्या परीसरात किंवा आजुबाजूच्या बंगल्यांन मध्ये अमली पदार्थांची विक्री किंवा सेवन आढळल्यास संबंधित यंत्रणेला कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पालकांनी आपल्या तरुण मुलांच्या बदलत्या वर्तनाकडे, मित्रपरिवाराकडे आणि दिनचर्येकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मुलांशी संवाद साधणे, त्यांना नशेचे दुष्परिणाम समजावून सांगणे आणि गरज भासल्यास समुपदेशनाची मदत घेणे महत्त्वाचे आहे.

नशेचे व्यसन केवळ एका व्यक्तीचे आयुष्य उद्ध्वस्त करत नाही, तर संपूर्ण कुटुंबाला त्याचे परिणाम भोगावे लागतात.

आता नागरिकांनीच पुढाकार घेण्याची वेळ आली आहे. कारण लोणावळा शहराची ओळख पर्यटन, निसर्गसौंदर्य आणि शांत वातावरण अशी आहे. ही ओळख टिकवायची असेल, तर अमली पदार्थांच्या गैरव्यवहाराविरोधात प्रशासन आणि नागरिकांनी एकत्र येणे गरजेचे आहे.

*प्रश्न एका शहराच्या प्रतिमेचा नाही, तर आपल्या तरुण पिढीच्या भविष्याचा आहे!**

अमली पदार्थांच्या विळख्यात अडकण्यापूर्वी तरुणाईला वाचवण्यासाठी आता ठोस कारवाई, प्रभावी जनजागृती आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

चला... एकत्र येऊया!

नशामुक्त लोणावळा, सुरक्षित लोणावळा!

म्हणुन आता! लोणावळेकरांनों शहराच्या सुरक्षित भविष्यासाठी तुमचा आवाज बुलंद करा!**

— सतिश हजारे, पुणे

शिक्षा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६७ वा दीक्षांत समारंभ उद्या होणार



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६७ वा दीक्षांत समारंभ उद्या, ४ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. या प्रतिष्ठित समारंभात विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांतील हजारो विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान केल्या जातील. अनेक वर्षांपासून रखडलेला हा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

या दीक्षांत समारंभासाठी विशेष तयारी करण्यात आली असून, सर्व आवश्यक सोपस्कार पूर्ण केले जात आहेत. पदवीदान समारंभाला विद्यापीठाचे कुलगुरू, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आणि विविध विभागांचे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. तसेच, या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विशिष्ट व्यक्तींना आमंत्रित करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांसाठी हा क्षण अत्यंत महत्त्वाचा असून, त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीला नवी दिशा देणारा ठरेल. पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये उत्साह असून, त्यांच्या पालकांसाठीही हा अभिमानाचा क्षण आहे. विद्यापीठाने या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत.

— IMRAN BELIM, औरंगाबाद

घेतला तरुणाचा बळी; गोराडखेड्याजवळ दुचाकी २५ फूट खोल कोसळली...!!!



विभागीय प्रतिनिधी

पाचोरा : रेल्वे मार्गाच्या कामासाठी खोदून ठेवलेल्या खोल खड्ड्याने एका तरुणाचा जीव घेतला. पाचोरा-जळगाव महामार्गावर गोराडखेडा गावालगत शुक्रवारी, ३१ ऑक्टोबर रोजी रात्री अकराच्या सुमारास ही भीषण दुर्घटना घडली. दुचाकी थेट खड्ड्यात कोसळल्याने खडकदेवळा येथील २५ वर्षीय युवक जागीच ठार झाला, तर त्याच्यासोबत असलेले दोन तरुण जखमी झाले.

मृत तरुणाचे नाव विकी संजय निकम (वय २५, रा. खडकदेवळा) असे आहे. विवेक प्रकाश पाटील आणि सोनू नाईक अशी जखमींची नावे आहेत. तिघेही दुचाकीवरून माहिजीहून खडकदेवळ्याच्या दिशेने येत होते. गोराडखेडा परिसरात पाचोरा-जामनेर रेल्वे मार्गाच्या ब्रॉडगेजच्या कामासाठी सुमारे २५ फूट खोल खड्डा खोदण्यात आला आहे.

रात्रीच्या काळोखात रस्त्यालगतचा हा खड्डा दिसला नाही. त्यामुळे भरधाव दुचाकी थेट खड्ड्यात आदळली. अपघात इतका भीषण होता की, विकीचा जागीच मृत्यू झाला. विवेक आणि सोनू यांना गंभीर दुखापत झाली.

अपघाताची माहिती मिळताच रुग्णवाहिका चालक भागवत पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्या मदतीने विकीला पाचोरा ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, तपासणीअंती डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.


पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला असून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेने खडकदेवळा गावावर शोककळा पसरली आहे.

विकी हा व्यवसायाने जेसीबी चालक होता. त्याच्या मागे वृद्ध आई आणि मोठा भाऊ असा परिवार आहे. रेल्वे कामाच्या ठिकाणी सुरक्षेसाठी कोणतीही उपाययोजना नसल्याने हा अपघात घडल्याचा आरोप स्थानिकांमधून होत आहे.

— Maheshprasad Ramkrishnaprasad Dixit

स्थानीय

परिवहन मंत्री प्रतिप सरनाईक यांनी सोलापूर बस स्थानकातील दुर्गंधीवर अधिकाऱ्यांना सुनावले




सोलापूर बस स्थानकात पसरलेल्या तीव्र दुर्गंधीला प्रत्यक्ष पाहिल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रतिप सरनाईक यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

मंत्री यांनी स्थानिक अधिकाऱ्यांना त्वरित बोलावून परिस्थितीचे स्पष्टीकरण मागितले आणि दोषी व्यक्तींची जबाबदारी ठरविण्याची मागणी केली.

सुनावनंतर, संबंधित विभागाने दुर्गंधीचे कारण शोधून तत्काळ स्वच्छता व सुधारणा कार्यवाही सुरू करण्याचे आश्वासन दिले.

— YALLAPPA RAGATE (PATIL), सोलापुर

पुण्याच्या के के मार्केटमध्ये PMPML बस अपघात, १ मृत्यू व ५ जखमी



पुणे, महाराष्ट्र – के के मार्केट परिसरात PMPML बसचा धक्का बसला, ज्यामुळे एक व्यक्तीचा मृत्यू आणि पाच जण जखमी झाले. अपघाताची त्वरित नोंद पोलिसांना मिळाली आणि त्यांनी घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला.

जखमी व्यक्तींना तत्काळ रुग्णालयात नेले गेले, जिथे त्यांची प्राथमिक उपचार करण्यात आले. मृत्यूचा कारण ठरविण्यासाठी फोरेंसिक पोस्ट-मॉर्टेम करण्यात येणार आहे.

पोलिस अधिकाऱ्यांनी अपघाताची कारणे तपासण्याची घोषणा केली असून, भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना टाळण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन करण्याची विनंती केली आहे.

— MHATAB IELAI MULLA, पुणे

राजनीति

वंचित बहुजन आघाडी आंदोलनाची घोषणा



वंचित बहुजन आघाडी आंदोलनाने आज सामाजिक व आर्थिक हक्कांच्या मागणीत आपली भूमिका पुन्हा अधोरेखित केली आहे.

या आंदोलनाचा मुख्य उद्देश वंचित वर्गांच्या प्रतिनिधित्वाची मागणी करणे व त्यांच्या समस्यांचे निराकरण करणे आहे. संघटनेने विविध प्रदेशांतील सदस्यांना एकत्रित होण्याचे आवाहन केले आहे.

आंदोलनाच्या माध्यमातून सामाजिक समतेची आणि न्याय्य विकासाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे, ज्यामुळे राजकीय चर्चेत नवीन दिशा मिळेल.

— YALLAPPA RAGATE (PATIL), सोलापुर

राजनीति

ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती बिघडली, पुण्याच्या रुबी रुग्णालयात दाखल



ज्येष्ठ नेते शरद पवार यांची अचानक प्रकृती बिघडल्यामुळे ते पुण्याच्या रुबी रुग्णालयात दाखल झाले. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार कफ व अशक्तपणाची लक्षणे दिसल्यामुळे रुग्णालयात उपचार सुरू केले आहेत.

पवार यांनी ३१ ऑक्टोबर-१ नोव्हेंबर दरम्यान सोलापूर जिल्ह्याच्या माढा तालुक्याच्या तुळशी व पंढरपूर तालुक्याच्या दुधाळी गावांना दुष्काळ स्थितीचा आढावा घेण्यासाठी भेट दिली होती. तिथे शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्यांचे नोंदविले आणि सरकारकडे मांडण्याचे आश्वासन दिले.

त्यानंतर पवार सोलापूरहून पुण्याला परतले, परंतु प्रवासादरम्यान प्रकृती बिघडल्यामुळे दौरा रद्द करावा लागला. हवामानातील प्रतिकूल परिस्थितीचा उल्लेखही केला गेला, परंतु वैद्यकीय कारणे प्रमुख ठरली.


रुबी रुग्णालयात विविध तपासण्या व विश्रांतीचा सल्ला दिला गेला आहे. डॉक्टरांनी कफ व थकव्याच्या लक्षणांवर लक्ष देत उपचार सुरू केले आहेत.

दुष्काळी परिस्थितीचे पुनःनिरीक्षण करतील, असे करमाळ्याचे आमदार नारायण पाटील यांनी सांगितले. बारामती-भिगवण परिसरातील पावसामुळे आधीचा दौरा रद्द झाला होता.

— Dr.Aniket Mestri, पुणे

धर्म

कार्तिक स्नान काकडा महोत्सवाला श्री चारंगबाबा मंदिर सुरू



जुन्नर तालुक्यातील पिंपरी पेंढार गावांमधील दुरगुडपट नंबर 1 येथील श्री चारंगबाबा मंदिरात काकडा महोत्सवाला सुरुवात झाली असून अनेक ज्येष्ठ ग्रामस्थ मतभेद यासाठी उपस्थित असतात. यामध्ये श्री लक्ष्मण विठ्ठल दुरगुडे . श्री विलास दुरगुडे . श्री दत्तात्रय दुरगुडे श्री नामदेव दुरगुडे श्री दशरथ दुरगुडे श्री राधू दुरगुडे महिलांमध्ये सौ सुरेखा दुरगुडे सौ शैला दुरगुडे .सौ विद्या दुरगुडे सौ अनिता दुरगुडे . . संगिता दुरगुडे हिराबाई दुरगुडे असे अनेक ग्रामस्थ काकडे साठी उपस्थित राहतात पहाटे ठीक ४.वा. देवाला स्नान घालून पूजा करून काकड्याला सुरुवात होती सकाळी ठीक ७.०० पर्यंत काकडा सुरू असतो पसायदानाने काकडेची सांगता होते महाराष्ट्रात पहाटे बऱ्याचशा मंदिरामध्ये हा काकडा होतो तुळशी विवाह नंतर काकडाची सांगता होता. संपूर्ण महिनाभर काकड सुरू असतो या महिन्यात कार्तिक स्नानाला विशेष महत्त्व असतं.

— Ashok durgude, पुणे

कृषि

शहा येथे मोफत वैरण बियाणे वाटप, पशुपालकांना मोठा दिलासाफ



शहा, इंदापूर (प्रतिनिधी) दि. 03 नोव्हेंबर 2026 -

पुणे जिल्हा परिषद, पुणे व महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभाग यांच्या वतीने आज शहा येथे पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या माध्यमातून मोफत वैरण बियाणे वाटप कार्यक्रम 2026-2027 मोठ्या उत्साहात पार पडला.


पशुवैद्यकीय चिकित्सालय, शहा येथे सकाळी 9 वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा परिषद सदस्य मा यशराज (भैय्या) जगदाळे, पंचायत समिती सदस्या मा सौ कल्पनाताई विष्णू पाटील, पंचायत समिती सदस्य अजित खबाले तालुका पशुसंवर्धन व दुग्ध विकास अधिकारी मा डॉ संजय शिंदे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन मा डॉ सचिन खेमलापुरे व शहाचे पशुवैद्यकीय अधिकारी मा डॉ मारुती काझडे आदर्श सरपंच श्री दिलीप पाटील माजी सरपंच श्री विष्णू आबा पाटील तंटामुक्त अध्यक्ष धनाजी इजगुडे ह भ प भाऊ महाराज खबाले प्रकाश पाटिल ज्ञानदेव इजगुडे दत्तात्रय बनसोडे बलभीम गंगावणे हनुमंत पांढरे हनुमंत निकम शौकत मुलाणी व सर्व शहा ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

यावेळी शहा व परिसरातील शेकडो पशुपालक शेतकऱ्यांनी 7/12, रेशन कार्ड, आधार कार्डसह उपस्थित राहून योजनेचा लाभ घेतला. बियाणे मर्यादित असल्याने प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर वाटप करण्यात आले. तसेच एका रेशन कार्डवर एकाच लाभार्थ्याला लाभ देण्यात आला.

चारा टंचाईवर मात करण्यासाठी व दुधाळ जनावरांसाठी सकस वैरण उपलब्ध व्हावी या उद्देशाने शासनाची ही योजना अत्यंत उपयुक्त ठरत असल्याची प्रतिक्रिया यावेळी पशुपालकांनी व्यक्त केली.

— रीपोर्टर दिलीप नगरे

मेमी विक्रमी पाऊस; रस्ते जलमय, जनजीवन विस्कळीत!



बारामती:

पावसाने नोव्हेंबरच्या सुरुवातीलाच बारामती शहरासह तालुक्याला अक्षरश: झोडपून काढले आहे. मध्यरात्रीपासून सुरू झालेल्या या मुसळधार पावसामुळे अवघ्या ६ तासांत तब्बल १५८ मिलीमीटर इतक्या विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे संपूर्ण बारामती शहर जलमय झाले असून नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. एकाच रात्रीत थेट महिनाभराचा पाऊस कोसळल्याने सर्वत्र पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

मुख्य घडामोडी आणि पावसाचा प्रभाव:

पावसामुळे शहरातील मुख्य रस्त्यांवरून पाण्याचे लोंढे वाहत असून रस्त्यांना ओढ्यांचे स्वरूप आले आहे. प्रमुख मार्गांवर गुडघाभर पाणी साचले आहे.

• वाहतूक ठप्प: बारामती-भिगवण रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. मुख्य बसस्थानक परिसर पाण्याखाली गेल्याने राज्य परिवहन महामंडळाच्या (ST) बस सेवा विस्कळीत झाल्या असून प्रवाशांचे हाल होत आहेत.

ओळखून आणि विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता, बारामती नगरपरिषदेच्या सर्व शाळांना तातडीची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

• अनेक भागांत वीजपुरवठा खंडित: पहाटेपासूनच शहराच्या विविध भागांतील वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे.

शेतीवर दुहेरी परिणाम:

दुष्काळाच्या सावटाखाली असलेल्या बारामतीकरांना या पावसाने तात्पुरता दिलासा दिला असला, तरी ऐन काढणीच्या वेळी आलेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. ऊस आणि चारा पिकांना यामुळे जीवदान मिळणार असले, तरी द्राक्ष व डाळिंब बागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

— YALLAPPA RAGATE (PATIL), सोलापुर